<u>वादी करीता सा.क्र.१</u>

<u>प्रतिवादींकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.एच.व्ही.गायकवाड यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>

१७. दावा दाखल केला त्यावेळी दाव्यात नमूद मिळकत माझ्या पतीच्या नावे नव्हती हे म्हणणे खरे नाही. दाव्यातील नमूद मिळकत प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या नावाने करण्यात आली म्हणून मी त्यांच्या विरूध्द दावा दाखल केला आहे. सद्या दाव्यात नमूद मिळकत प्रतिवादी क्र.२ व ३ हे वहिवाटतात. दाव्यात नमूद मिळकतीचा सर्वे क्रमांक व त्याचे क्षेत्र मी सांगू शकत नाही.

प्रश्न- प्रतिवादी क्र.१ नरसिंग अलगूडे यांच्या नावे दाव्यात नमूद मिळकत कशी आली होती हे तुम्हाला माहित आहे का ?

उत्तर- ती मिळकत आम्ही दोघांनी खरेदी केली आहे.

१८. दाव्यातील नमूद मिळकत केव्हा खरेदी केली ते मला माहित नाही. दाव्यात नमूद मिळकतीचा मोबदला ही खरेदी घेत असताना मी व माझे पती नरसिंग अलगूडे यांनी मिळून दिलेला आहे. त्यावेळेस आम्ही दोघेही कमवितो होतो.

प्रश्न- तुम्ही अंदाजे किती मोबदल्याची रक्कम दिली ?

उत्तर- मी स्वत: मजूरी करून आलेली रक्कम माझे पती नरसिंग अलगूडे यांच्याकडे देत होते.

१९. त्यावेळेस अंदाजे रू.३००/- रोजगार मला मिळत होता. सद्या मी रू.९,०००/- ते रू.१०,०००/- प्रति महा रोजगार कमविते हे म्हणणे खरे नाही. लाडक्या बहिण योजनेअंतर्गतची व संजय गांधी निराधार योजन अंतर्गतची मी शासकीय रक्कम उचलत नाही. मला दरवर्षी कौटूंबिक भांडे मोफत मिळतात हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न- तुम्हाला स्वस्त धान्य दुकानातून उपजिवीका चालविण्यासाठी मोफत धान्य दरमहा मिळते ?

उत्तर- मला दरमहा केवळ २ किलो गहू व ३ किलो तांदूळ एवढेच धान्य मिळते.

२०. मी माझ्या पती नरसिंग अलगूडे यांच्या सोबत राहत असताना आम्ही

दोघेही घर खर्च  भागवित होतो हे म्हणणे खरे आहे. मी सद्याही रोजदांरीची कामे करते हे म्हणणे खरे नाही. मी सद्या भुतमुगळी येथे भाडयाचे घर घेऊन राहते. मी ज्या घरात भाडयाने राहते त्या घर मालकाचे नाव मला माहित नाही. मला प्रतिमहा रू.७००/- घरभाडे दयावे लागते. ती घर भाडयाची रक्कम मी नातेवाईकांकडून घेऊन देते. भुतमुगळी गावची एकूण लोकसंख्या मला माहित नाही.

<u>प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास तहकूब</u>.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD Date: 2025.06.27 17:59:29 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २७/०६/२०२५.

<u>मध्यान्हानंतर प्रतिवादींकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.एच.व्ही. गायकवाड यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>

२१. दाव्यात नमूद मिळकतीचे खरेदीखत माझे  पती नरसिंग अलगूडे यांच्या एकटयाच्याच नावचे आहे. माझे पती नरसिंग अलगूडे यांची दाव्यातील नमूद मिळकत ही स्वकष्टार्जित आहे म्हणूनच त्यांनी त्याची विल्हेवाट लावली हे म्हणणे खरे नाही. दाव्यातील नमूद मिळकत कडाजी सावंत यांच्याकडून खरेदी केली होती. त्या खरेदीखतावर माझी सही नाही. प्रतिवादी क्र.१ नरसिंग अलगूडे यांनी पूर्वी मंजूर झालेली पोटगी आजपर्यंत भरलेली आहे हे म्हणणे खरे नाही. न्यायालयीन निर्णयाआधारे दाव्यातील  नमूद मिळकत प्रतिवादी क्र.२ व ३ यांना मिळाली आहे हे म्हणणे खरे नाही. माझे पती नरसिंग अलगूडे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी भारतबाई या राहतात. भारतबाई यांना माझे पती नरसिंग अलगूडे हे सांभाळतात.

२२. पोटगीचा दावा क्र.६२२/१९९७ हा सन-२००० साली मंजूर झाला व मला रू.३००/- प्रतिमहा पोटगी मंजूर झाली हे म्हणणे खरे आहे. पोटगीचा दावा क्र.६२२/१९९७ मधील न्यायनिर्णयाविरुध्द मी अपील केले नाही. पूर्वीचा पोटगीचा

**वि.दि.दा.क्र.३३/२०२३**
**नि.क्र.९**

आदेश अस्तित्वात आहे हे म्हणणे खरे आहे. माझे पती नरसिंग अलगूडे सद्या झोपून असतात हे म्हणणे खरे नाही. माझे पती नरसिंग अलगूडे यांच्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत हे म्हणणे खरे नाही. मी माझे पती नरसिंग अलगूडे यांना २० वर्षांपूर्वी भेटले होते. माझे पती नरसिंग अलगूडे यांची कोणतीच परिस्थिती मला माहित नसल्यामुळे मी चुकीची साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. माझे पती नरसिंग अलगूडे यांना निवृत्तीवेतन मिळत नसून सद्या त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. माझे पती नरसिंग अलगूडे यांना सांभाळण्याची माझ्यावर वेळ येवू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. मी स्वत:ची उपजिवीका करण्यास समर्थ आहे हे म्हणणे खरे नाही. माझा सरतपास खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. आमचा पूर्वीचा वाटपाचा दावा खारीज झाला हे म्हणणे खरे आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.06.27 17:59:11 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २७/०६/२०२५.